दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २६९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२९ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# १३ महिने २६ दिवसांनी अनिल देशमुख तुरुंगाबाहेर

## राष्ट्रवादीचे बडे नेते स्वागताला; कार्यकर्त्यांकडून जल्लोष

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**१०० कोटी वसुली प्रकरणात कारागृहात असलेले राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख अखेर आज कारागृहाबाहेर आले आहेत. देशमुख यांच्या जामिनावरील स्थगिती आणखी वाढविण्याची सीबीआयची मागणी हायकोर्टाने मंगळवारी फेटाळली होती. त्यानंतर आज देशमुखांचा जामिनावर सुटण्याचा मार्ग मोकळा झाला. अनिल देशमुख यांच्या जामिनाच्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यानंतर दुपारी पाच वाजता अनिल देशमुख कारागृहा बाहेर आले.**




अनिल देशमुख यांच्या स्वागतासाठी आर्थर रोड तुरुंगाबाहेर आज राष्ट्रवादीचे पाच दिग्गज नेते उपस्थित होते. राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, छगन भुजबळ आणि दिलीप वळसे पाटील कारागृहाबाहेर उपस्थित होते.

अनिल देशमुख यांचं हार घालून स्वागत करण्यात आलं. तर कार्यकर्त्यांनी देशमुख यांना खांद्यावर उचलून घेत जल्लोष साजरा केला.

कारागृहाबाहेर यावेळी प्रचंड गर्दी झाली असून ढोल-ताशांच्या गजरात देशमुख यांचं स्वागत करण्यात आलं आहे.

१२ डिसेंबरला न्या. मकरंद कर्णिक यांच्या एकलपीठाने देशमुख यांना जामीन मंजूर केला. नंतर सीबीआयने सुप्रीम कोर्टात जाण्यासाठी जामिनावर १० दिवसांची स्थगिती देण्याची विनंती केली होती. ती मान्य झाली.

मात्र, सुप्रीम कोर्टाचे सुटीकालीन कोर्ट नसल्याने सीबीआयने पुन्हा हायकोर्टात जामिनावरील स्थगिती ३ जानेवारीपर्यंत वाढविण्याची विनंती केली. मात्र, कोर्टाने ती अमान्य केली होती.

# महापालिका हद्दीत सार्वजनिक विकासावर भर देण्याची आ.प्रशांत ठाकूर यांची मागणी

## पनवेल महानगरपालिकेकडे सिडको दुर्लक्ष करणार नाही याची दक्षता घेणार : उदय सामंत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेच्या हद्दीमध्ये जास्तीत जास्त प्रमाणामध्ये सार्वजनिक सोयी सुविधा विकसित झाल्या पाहिजे यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात केली. त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेकडे देखील सिडको दुर्लक्ष करणार नाही याची दक्षता घेण्याचे आश्वासन रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सभागृहात दिले.



आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबई विकासाच्या दृष्टिकोनातून सिडको संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती त्याला अनुसरून आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपप्रश्न मांडत पन-वेल महानगरपालिका हद्दीत सिडकोने जास्तीत जास्त सार्वजनिक विकासावर भर देण्याची मागणी केली. मुंबईच्या निर्मितीमध्ये नवी मुंबई महापालिकेच्या बरोबरीने आता पनवेल महापालिकेची निर्मिती झाली आहे आणि पनवेल महापालिका हद्दीमध्ये जिथे महापालिका नियोजन प्राधिकरण आहे त्याही ठिकाणी अशाच पद्धतीने सिडकोच्या ताब्यात असलेल्या भूखंडांवरती वेगवेगळ्या पद्धतीने सामाजिक सुविधा विकसित करण्याची आवश्यकता आहे पण त्या ठिकाणी सर्रास इमारती विकसित करण्यासाठी म्हणून त्यांची विक्री किंवा लाँग लीज करण्याच्यासाठी सिडकोने जाहिराती काढल्यास सिडकोला निधी मिळणार आहे यातून सिडकोला मोठ्या प्रमाणात निधी मिळणार आहे. पण ज्या शहराची निर्मिती केली आहे तेही त्याचाच एक भाग आहे त्यामुळे त्याच्याकडेही तितक्याच सहानुभूतीने सिडको व शासनाने पहावे. आणि पनवेल महापालिकेलासुद्धा या दृष्टिकोनातून जे रिप्रेझेंटेशन द्यायचे त्याच्यासाठी सोबतीने संधी देण्यात यावी आणि महापालिकेच्या हद्दीमध्ये सार्वजनिक सोयी सुविधा जास्तीत जास्त प्रमाणामध्ये विकसित झाल्या पाहिजेत आणि याच्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची गरज आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना अधोरेखित केले. यावर आपल्या उत्तरात बोलताना उद्योग व रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी, पनवेलच्या संदर्भामध्ये जो प्रश्न या ठिकाणी मांडलाय त्याचा देखील सकारात्मक विचार केला जाईल असे सांगतानाच या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर यांना आमंत्रित करण्यात येणार असून पनवेल महानगरपालिकेकडे देखील सिडको दुर्लक्ष करणार नाही याची दक्षता घेतली जाईल, असेही नामदार उदय सामंत यांनी आश्वासित केले.

# फोन टॅपिंग प्रकरणाला नवे वळण; शुक्ला यांच्या अडचणी वाढणार

**दै.रायगड नगरी । पुणे**

फोन टॅपिंग प्रकरणी चर्चेत असलेल्या पुण्याच्या माजी पोलिस आयुक्त आणि सध्या CRPFच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या अडचणी आणखी वाढणार असल्याचे दिसते. फोन टॅपिंग प्रकरणाच्या चौकशी दरम्यान पोलिस उपायुक्त पंकज डहाणे यांनी एक मोठा खुलासा केलाय.



पोलिस उपायुक्त पंकज डहाणे यांनी केलेल्या नव्या खुलासाने फोन टॅपिंग प्रकरणाला पुन्हा एकदा नवे वळण मिळण्याची शक्यता आहे. शुक्ला यांनी फोन टॅपिंग आम्हाला फोन टॅपिंग करायला लावले होते असे डहाणे यांनी चौकशीच्या वेळी सांगितले आहे. हे फोन टॅपिंग मार्च २०१६ ते जुलै २०१८ या काळात करण्यात आले होते.

### मराठी नाटकांच्या भाड्यामध्ये ७५% सवलत...

# भाजपच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांचे आभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांच्या भाड्यामध्ये ७५ % सवलतीच्या निर्णयाचे भाजपच्यावतीने स्वागत करण्यात आले असून या निर्णयाबद्दल पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांचे आभार मानण्यात आले आहेत. आभार पत्र देताना भाजप उत्तर रायगड सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, श्यामनाथ पुंडे, स्मिता गांधी, गणेश जगताप आदी कला सांस्कृतिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते.



या संदर्भात आयुक्त गणेश देशमुख यांना भाजप उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने आभार पत्र देण्यात आले आहे. या आभारपत्रात म्हंटले आहे कि, कोरोना संसर्गानंतर मुंबईपासून जवळ असणाऱ्या मेट्रोपॉलिटिन शहरांमध्ये पनवेल हे नाट्य कलावतांसाठी मध्यवर्ती ठिकाण बनले आहे. कोरोना साथरोगानंतर मराठी नाट्य व्यवसायावर आलेली मरगळ दूर करण्यासाठी कलाक्षेत्रातून मराठी नाट्य व्यवसायाला बळ मिळण्यासाठी भाडेदरात सवलत मिळण्याची मागणी केली जात होती. ह्या मागणीचा विचार करत तसेच पनवेलकरांची सांस्कृतिक भूक भागावी व उत्तमोत्तम नाट्य कलाकृती पनवेलकर रसिकांना बघायला मिळाव्यात ह्या हेतूने नुकत्याच पार पडलेल्या प्रशासकीय बैठकीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाने सुचविलेल्या ७५ टक्के भाडे सवलतीच्या ठरावाला मंजुरी दिली त्या बद्दल आपले मनस्वी आभार. व्यवस्थापन, विज आणि मनुष्यबळासाठी होणारा खर्च लक्षात घेता हा निर्णय पालिकेला परवडणारा नाही.

तरीही पनवेलकरांची नाट्यक्षेत्राविषयी असलेली ओढ लक्षात घेऊन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना आपण ७५% भाडे सवलत देण्याचा निर्णय घेतला आहेत. आणि हा थोड्याथोडक्या काळासाठी नाही तर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत हा लागू असणार आहे.

# बाळगंगा प्रकल्पग्रस्तांवरील खटले मागे घेण्यासंदर्भात लवकरच निर्णय : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । नागपूर**

रायगड जिल्ह्यातील बाळगंगा धरण संघर्ष व पुनर्वसन समितीचे कार्यकर्ते आणि प्रकल्पग्रस्तावरील गुन्हे मागे घेण्यासंदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तावरील गुन्हे मागे घेण्याच्या अनुषंगाने सदस्य शशिकांत शिंदे यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. त्यावेळी श्री.फडणवीस यांनी ही माहिती दिली.




याबाबत अधिक माहिती देतांना श्री फडणवीस यांनी सांगितले की, राजकीय व सामाजिक आंदोलनामध्ये ३१ डिसेंबर २०१९ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेले सर्व खटले शासन निर्णयामध्ये नमूद अटीवर मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदर खटले काढून घेण्याची कार्यवाही करण्यासाठी सविस्तर सूचना व कार्यपध्दती निर्गमित करण्यात आली आहे. त्यातील तरतूदीनुसार ज्या गुन्ह्यामध्ये दि. ३१.०३.२०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत. या शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्तींची पूर्तता होत आहे, असे खटले मागे घेण्यासाठी कायदेशीर तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर खटल्यांसदर्भात कार्यवाही करण्यासाठी पोलीस आयुक्तालय क्षेत्राकरिता व जिल्ह्याकरिता समिती गठित करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र वगळून जिल्ह्याकरिता महसूल उपविभागनिहाय महसूल उप विभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार निर्णय घेण्यात येत आहे. याप्रकरणी लवकरच निर्णय घेण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

गिरणी कामगारांच्या संदर्भातही लवकरच निर्णय घेण्यात येईल, प्रकल्प ग्रस्तांच्या प्रलंबीत असलेल्या नोकऱ्यासंदर्भात वस्तुस्थिती तपासून त्यावर योग्य निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य जयंत पाटील, सचिन अहिर, एकनाथ खडसे यांनी सहभाग घेतला.

# श्रीवर्धन पर्यटन वाढीचे स्वप्न अधुरेच

## दहा वर्षानंतर ही बाणकोट पुलाची प्रतिक्षाच



**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**

**दिघी : रायगड व रत्नागिरी या दोन पर्यटन जिल्ह्यांना जोडणारा श्रीवर्धन तालुक्यातील महत्वकांक्षी बागमांडला खाडीवरील पूल आज दहा वर्षे पुर्ण होत असताना अपूर्णच आहे. येथील कोकण वाशीयांनीं पर्यटन वाढीसाठी बघितलेलं स्वप्न अधुरेच राहिले आहे.**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन कोकण किनारपट्टीच्या बागमांडला आणि रत्नागिरींतील वेश्वी दरम्यानच्या बाणकोट खाडीवर वरळी-सी लिंकप्रमाणे बाधण्यात येणाऱ्या पुलाचे भूमीपूजन नोव्हेंबर २०१२ मध्ये होऊन कामाला सुरुवात झाली. आजमितीला २०२२ वर्ष संपत असून, दहा वर्षे उलटूनही या पुलाचे काम रखडले आहे. त्यामुळे पुलासाठी आणखी किती वर्षे थांबावे लागणार असा सवाल स्थानिक व पर्यटक करत आहेत.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून हा महत्त्वाकांक्षी सागरी सेतू उभारण्यात येणार आहे. या कामाची सुरुवात सुप्रीम इंफ्रास्ट्रक्चर या कंपनीकडून करण्यात आली. मे २०१६ मध्ये या पुलाचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते, कारण या सेतूमुळे रायगड व रत्नागिरी जिल्हे सागरी मार्गाने जोडले जातील, शिवाय या जिल्ह्यांतील पर्यटन व्यवसाय आणि निर्यात वाढीला चालना मिळणार आहे. मात्र, गेली तीन ते चार वर्ष येथील काम बंद आहे.

बाणकोट खाडी पुलाचे काम सध्या महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ कडे वर्ग झाले असून या पुलाच्या कामासाठी नवीन निविदा प्रसिद्धी करण्यात आली आहे. त्यामुळे रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणाऱ्या या पुलासाठी अजून किती वाट पहावी लागणार हे अनुत्तरित आहे. पुढे रायगड - रत्नागिरी जिल्हे सागरी महामार्गाने जोडले जाणार व पुढे सिंधुदुर्गकडे जाणाऱ्या पर्यटकांना मंडणगड, दापोलीमार्गे सर्वात जवळचा पर्यायी मार्ग असणार. त्यामुळे कमी प्रवास होऊन वेळ तसेच इंधनाची बचत होईल असं काही पर्यटन वाढीसाठी स्वप्न पाहणाऱ्या कोकण वाशीयांच्या पदरात प्रतिक्षाच उरली आहे.

### वाढत्या कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर...

# पनवेलमधील २२ खाजगी तर २ शासकीय रूग्णालयांमध्ये मॉक ड्रील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चीनमधील वाढत्या कोरोनासंसर्गाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सूचनेनूसार पनवेल महापालिका क्षेत्रातील २२ खाजगी रूग्णालये तसेच दोन शासकीय रूग्णालयांतील उपाययोजनांची पाहणी अर्थात 'मॉक ड्रील'( संकट कालीन बचाव प्रशिक्षण) महापालिकेच्या वैद्यकिय वतीने घेण्यात आले.

वाढत्या कोराना संसर्गाच्या पार्श्वभूमीवरती पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर येथील एकुण २२ खाजगी रूग्णालये आणि दोन शासकीय रूग्णालयांतील आरोग्य सुविधांची उपलब्धता, अलगीकरण खाटांची क्षमता, आयसीयू व व्हेटिंलेटर, ऑक्सीजन सुविधायुक्त खाटा, ऑक्सीजन सिलेंडर, ऐनवेळी लागणारी औषधे, इंजेक्शन्स, पीपीई किट या सर्वांची चाचपणी करण्यात आली. वैद्यकिय आरोग्य विभागाच्या प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर आणि त्यांच्या टिमने नुकतेच पनवेलमधील कोविडची परवानगी असणाऱ्या रूग्णालयाची तसेच कळंबोली येथील कोविड समर्पित केंद्राची पाहणी केली. तसेच सहा नागरी आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी त्यांच्या त्यांच्या परिक्षेत्रात येणाऱ्या कोविड रूग्णालयाची तपासणी आज(२८ डिसेंबर) केली.

महापालिकेच्यावतीने कळंबोली येथील कोविड समर्पित केंद्रामध्ये ४० खाटा आणि दुसऱ्या मजल्यावरती कोविड केअर सेंटर ३० खाटांचे नियोजन करण्याची तयारी सूरू करण्यात आली आहे. येथील सोयी सुविधांची पहाणीही या मॉकड्रिलमध्ये घेण्यात आली. महापालिकेच्यावतीने सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नागरिकांसाठी आरटीपीसीआर चाचण्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



# अविवेकाची काजळी

राजकारणात वावरणाऱ्यांनी संयम बाळगून, समाजाची काळजी घेऊन आणि व्यापक विचार करून बोलावे, ही अपेक्षा भारतात आता अर्थहीन झाली आहे. अर्थात, बाष्कळपणा करण्याचा मक्ता एकट्या राजकीय नेत्यांकडे नाही, हे तर खरेच आहे. नटनट्या, सेलिब्रिटी, सामाजिक कार्यकर्ते, नोकरशहा, खेळाडू, लेखक, कलावंत आणि सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे विविध धर्मांचे उपदेशक हे सारे तोल गेल्यासारखे बोलत असतात. सध्याच्या माध्यम क्रांतीमुळे असे कोणतेही वादग्रस्त, चिथावणीखोर किंवा हिंस्र विधान लक्षावधी-कोट्यवधी वेळा लोकांवर जाऊन आदळत राहते. ते छाप्यात जाते. श्राव्य संदेशातून जाते. व्हिडिओतून जाते. थोडक्यात, अशा विधानांनी काही काळ साऱ्या समाजमनाचा ताबा घेतला जातो. खासदार प्रज्ञासिंह ठाकूर या कधीच संयमाने बोलण्याबाबत प्रसिद्ध नव्हत्या. त्यांचा पूर्वेतिहासही अनेकदा चर्चिला गेला आहे. मात्र, त्यांना २०१९ मध्ये भोपाळमधून भाजपची उमेदवारी देण्यात आली आणि नंतर खासदार झाल्यापासून त्या काय वाट्टेल ते बोलत आल्या आहेत. कर्नाटकात शिवमोगा येथे बोलताना आता त्यांनी 'आपल्या घरातल्या भाजी चिरण्याचे चाकू चांगले धार लावून ठेवा. आपल्या मुलींना लव्ह जिहादपासून वाचवा. धारदार चाकूंनी जर भाजी कापली जात असेल तर त्या चाकूंनी शत्रूंचे गळेही कापले जाऊ शकतात,' असे विधान केले. हे बोलण्याआधी त्यांनी घरात शस्त्र ठेवा, असेही आवाहन श्रोत्यांना केले. एखाद्या लोकशाही देशात सर्वोच्च सभागृहाचा सभासद जाहीरपणे असे विधान करतो, हे जितके धक्कादायक तितकेच लांच्छनास्पद आहे. मात्र, प्रज्ञासिंह ठाकूर यांनी हे मुद्दाम केले आहे. याचे कारण, त्यांचे हे विधान येताच, ते कसे बरोबर आहे, असे सांगण्याची छोट्या-मोठ्या नेत्यांची चढाओढ लागली. त्यांच्या विरोधात पोलिसांकडे तक्रारीही दाखल होत आहेत. यातील एक तक्रार काही दिवसांपूर्वीच अटक करण्यात आलेले आणि सध्या जामिनावर असणारे तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते साकेत गोखले यांचीही आहे. हा विषय वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत राहावा आणि त्यातून या समाजातील वैरभावाला खतपाणी घातले जावे, असा मूळ विधानांमागचा हेतू आहे. तो पुरा करण्यास बाकी सारे टपलेलेच असतात. त्यांना ही मोठीच संधी असते. 'लव्ह जिहाद' हा शब्द सन २००९ पासून अधिक सढळपणे वापरला जातो. अलीकडे श्रद्धा वेलकर या तरुणीची ज्या निर्घृणपणे हत्या झाली; तेव्हापासून या चर्चेला एक नवी धार आली आहे. मात्र, कोणत्याही गुन्हेगाराकडे धर्माच्या चष्म्यातून पाहणे जसे अयोग्य आहे, त्याचप्रमाणे देशात आंतरधर्मीय विवाहांबद्दल एक प्रकारचा संशय निर्माण करणे, हेही योग्य नाही. भारतात विवाहासाठी मुलाचे वय २१ आणि मुलीचे वय १८ आहे. हे वय पार केलेल्या मुलामुलांनी जर परस्पर संमतीने विवाह केला तर साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर म्हणतात, त्याप्रमाणे कोणी कोणावर चाकू घेऊन धावून जायचे? या शिवमोगाच्या भेटीत साध्वी प्रज्ञासिंह हर्षा नावाच्या खून झालेल्या तरुण कार्यकर्तीच्या घरी गेल्या होत्या. ही हिंदुत्ववादी तरुणी हिजाब विरोधी आंदोलनात आघाडीवर होती आणि हा विषय तिने सतत लावून धरला होता. हर्षाची धर्मांधांनी नंतर हत्या केली. ही हत्या निषेधार्ह आहे आणि तिच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हायला हवी. मात्र, या गुन्हेगारांना शिक्षा व्हायला हवी, अशी मागणी करताना हातात शस्त्र घेण्याचा सल्ला देणे म्हणजे कायद्याच्या राज्याच्या विरोधात जाणे आहे, हे प्रज्ञासिंह यांच्या लक्षात यायला हवे होते. विशेषत: त्या सर्वोच्च कायदेमंडळाच्या सदस्य असताना त्यांनी हा संयम पाळायला हवा होता. एकीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भूतकाळातील संकुचित दृष्टिकोन सोडून भविष्यात व्यापक वाटचाल करण्याचे आवाहन करीत आहेत. हे आवाहन करताना त्यांनी 'औरंगजेबाच्या दहाशतवादाच्या विरोधात गुरू गोविंदसिंह कसे उभे राहिले' याचे उदाहरण दिले. तेव्हा त्यांनी भूतकाळातील चुका सुधारून नव्या भारताची निर्मिती करण्याचेही आवाहन केले. मात्र, औरंगजेबासारखा दहशतवाद नको असेल तर लोकशाहीच्या व कायद्याच्या राज्यात कुणाला हातात शस्त्रे घेऊन स्वत:च न्याय करता येणार नाही. त्यासाठी स्वातंत्र्य मिळण्याच्या आधीपासूनच काही व्यवस्था आणि यंत्रणा उभ्या झाल्या आहेत. त्यांचा प्रभावी वापर करून अन्याय होऊ देणार नाही, असे खरेतर म्हणायला हवे. पण असे बोलणाऱ्या साऱ्यांचे एक उफराटे तर्कशास्त्र असते. वादग्रस्त विधाने करणारे दुसरे कालिचरण महाराज हेही नुकतेच अमरावती येथे बोलताना 'धर्माच्या भल्यासाठी कुणाचा खून करणे वाईट नाही,' असे म्हणाले. हे म्हणजे कायद्याच्या राज्याच्या जागी मोगलाई आणण्यासारखेच झाले. प्रज्ञासिंह काय किंवा कालिचरण महाराज काय, हे जर गावगन्ना धर्मोपदेश करीत फिरत असतील तर त्यांना 'अविवेकाची काजळी फेडून विवेकदीप उजळण्या'चा आग्रह धरणारे संत ज्ञानेश्वर माहीत असणार. त्यांनी कायद्याच्या राज्याची जाणीव ठेवत आपल्याही अविवेकाची काजळी स्वच्छ करावी.

# पालीत मुख्य रस्त्यावर भरधाव कारने दुचाकीस्वाराला उडविले

## दोन मुली थोडक्यात बचावल्या



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरातील अरुंद रस्ते व वाहतुकीचे नियम तोडणारे वाहनचालक यामुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे. मंगळवारी सायंकाळी येथील सोनार आळीतील लब्धी ज्वेलर्स समोरील मुख्य रस्त्यावर एका भरधाव कारने दुचाकीस्वाराला उडविले आहे. यावेळी तेथून जाणाऱ्या दोन शाळकरी मुली थोडक्यात बचावल्या आहेत.

ही दृश्य लब्धी ज्वेलर्सच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहेत. या दुचाकीस्वाराला किरकोळ दुखापत व मुका मार लागला आहे.

येथील स्थानिक दुकानदारांनी त्याला मदत केली. या अपघातामुळे तसेच अरुंद रस्ते, बेदरकार वाहने चालविणारे वाहनचालक, अवैध वाहतूक यामुळे पालीतील बाह्यवळण मार्गाची आवश्यकता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.


पालीतील अरुंद रस्ते, अवजड वाहतूक, अवैधरीत्या पार्क केलेली वाहने व अनधिकृत बांधकामे यामुळे पालीत वारंवार वाहतूक कोंडी होते. परिणामी वाहनचालक, भाविक, पादचारी व विदयार्थ्यांची येथून वाट काढतांना मोठी गैरसोय होते. त्यामुळे जनतेतुन चीड आणि संताप व्यक्त होतोय.

येथील बल्लाळेश्वर मंदिर, ग.बा. वडेर हायस्कूल, जुने एस.टी.स्टँड, गांधी चौक, मारुती मंदिर, बाजारपेठ, हाटाळेश्वर चौक, मारुती मंदिर अशा बहुतांश ठीकाणी नियमित वाहतूक कोंडी होते. असंख्य कारणांमुळे पोलीसांना या वाहतुक कोंडीवर नियंत्रण मिळविणे अवघड होते. अनेक वेळा वाहतूक कोंडीमुळे रुग्णांना तसेच रुग्णवाहिकेस रुग्णालयात पोहोचण्यास उशिर होतो. वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून बाह्यवळण (बायपास) मार्ग लवकरात लवकर करण्यात यावा अशी मागणी येथील नागरिकांकडुन वारंवार होत आहे.

# कविंद्र परमानंदांच्या जन्मगावातील मठासह पोलादपूरच्या मठाचे ऐतिहासिक सुशोभिकरण आवश्यक

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**







**पोलादपूर** : छत्रपती शिवाजी महाराजांची कविश्वर आणि कविंद्र अशा उपाध्यांनी गौरविलेले कविंद्र परमानंद गोविंद नेवासेकर यांच्या अहमदनगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर तीर्थक्षेत्रापासून नेवासे या जन्मगावापासून केवळ १० कि.मी.अंतरावरील खेडले परमानंद या गावातील स्मारक देखील पडझडीने जर्जर झाले असून पोलादपूर शहरातील ऐतिहासिक वास्तुला सध्या अत्याधुनिक कार्यालयासारखे स्वरूप आणून सुशोभित करण्यात आले आहे. या दोन्ही स्मारकांचे ऐतिहासिक स्वरूपाचे सुशोभिकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असून पोलादपूर शहरातील दूर्गसृष्टी लोप पावल्याने या मठगल्लीतील स्मारकाचे आकर्षण संपुष्टात आल्याचे जाणवत आहे. यामुळे आधी ज्यांनी दूर्गसृष्टी उभारण्यासाठी लोकवर्गणी गोळा केली त्यांनाच याकामी पुन्हा एकदा संधी देण्यासोबत राज्यसरकारनेदेखील पोलादपूर आणि नेवासेगलतच्या खेडले परमानंद येथील दोन्ही स्मारकांना जिर्णोध्दाराद्वारे ऐतिहासिक चेहरामोहरा प्रदान करून कविंद्र परमानंदांचे यथोचित स्मरण करण्यास प्रवृत्त करावे, अशी मागणी व्यक्त होत आहे.

पोलादपूर शहरातील शिवकालीन स्वामी कवींद्र परमानंद यांच्या समाधीस्थळी दरवर्षी मकरसंक्रांतीचा वार्षिकोत्सव आणि गुढीपाडव्यानिमित्त गुढी उभारण्याचा उपक्रम अखंडीतपणे सुरू आहे. मात्र, येथे गेल्या काही वर्षांपूर्वी सौंदर्यीकरणाचे काम रखडले. यानंतर साकारण्यात आलेल्या दूर्गसृष्टीकडे संबंधित संस्थेकडून अक्षम्य दूर्लक्ष झाल्याने दूरवस्था झाली.

विधानपरिषद सदस्य अशोक मोडक यांच्या निधीतून तत्कालीन भाजपा तालुकाध्यक्ष मनोज भागवत यांच्या पाठपुराव्यातून १९ एप्रिल १९९७ रोजी स्वामी कवींद्र परमानंद यांच्या समाधीस्थळी झालेल्या सुशोभिकरणाचा उद्घाटनसोहळा तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे, बांधकाममंत्री नितीन गडकरी, राज पुरोहित आणि आ.अशोक मोडक यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी याठिकाणी समाधीस्थळ आणि वाचनालयाची खोली यांचा समावेश होता. यावेळी परमानंदांच्या जीवनाचा अल्पपरिचय देणारा लेख भिंतीवर रंगविण्यात आला होता. यानंतर ग्रामपंचायतीकडून रायगड जिल्हा परिषदेमार्फत तत्कालीन उपाध्यक्ष माणिक जगताप यांनी स्वामी परमानंद मित्र मंडळ या नोंदणीकृत संस्थेला दिवाबत्तीसाठी काही रक्कमेची तरतूद केली होती.याशिवाय, पोलादपूर ग्रामपंचायतीने काही रक्कम खर्ची घालून संरक्षण भिंत तसेच रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्यकार्यकारी अधिकारी पानिपतकार विश्वास पाटील यांनी सौंदर्यीकरणासाठी निधीची उप-लब्धता केली. हे काम अपूर्ण असतानाच एका स्थानिक संस्थेमार्फत येथे दूर्गसृष्टी उभारण्याचे काम सुरू झाले. यानंतरही काही लोकप्रतिनिधींनी येथे निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिल्यानंतर त्याची पूर्तता न झाल्याने सदर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांतील उत्साह कमी झाला. साधारणत: तोरणा, सिंधुदूर्ग, राजगड, शिवनेरी, चाकण, लोहगड, पुरंदर, प्रतापगड, जंजिरा आदींसह १७ भूईकोट, जलदूर्ग आणि गडकिल्ले यांच्या प्रतिकृती उभारल्यानंतर याकामी पदाधिकाऱ्यांचे दूर्लक्ष होऊ लागले आहे. परमानंदांच्या जीवनाचा अल्पपरिचय देणारा लेखही या संस्थेकडून भिंतींना रंगसफेदीदरम्यान पुसण्यात आला असल्याबद्दल सातत्याने विच-ारणा होऊनही आम्ही पक्क्या स्वरूपात लेख लिहिणार असल्याची माहिती संबंधितांकडून दरवर्षी देण्यात येत आहे. यादरम्यान, स्थानिक कवी स्वामी परमानंद मित्र मंडळ या संस्थेकडून दरवर्षी मकरसंक्रांतीचा वार्षिकोत्सव आणि आनंदनगरकडून चैत्र प्रतिपदेला गुढी उभारण्याचा उपक्रम नियमित होत आहे. २०१३ च्या गुढीपाडव्यावेळी नववर्षशोभा यात्रेचे आयोजन करून यात्रेचे विसर्जन याठिकाणी गुढी उभारून करण्यात आले होते. यावेळी सदर पदाधिकारी व त्यांचे कुटूंबिय या सोहळ्यात सामील झाले होते. ग्रामस्थांच्या काही शंकांना उत्तरे देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मिटींगमध्ये देणगीदारांच्या नावाचा फलक व देणगीची रक्कम तसेच कोणत्या निधीतून सौंदयीरकरण व दूर्गसृष्टी साकार झाली याविषयांची चर्चा झाली.

पोलादपूर ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाल्यानंतर याठिकाणचे स्थानिक नगरसेविका संगिता इंगवले आणि सध्याचे स्थानिक नगरसेवक प्रसाद इंगवले हा मुलगा व माजी नगरसेविका असलेल्या त्यांच्या आई यांनी संघटनात्मक कार्यासह या स्वामी कवींद्र परमानंद मठामधील उत्सव सुरू ठेवले. शालिवाहन शके, १५५१ शुक्लनाम संवत्सरे, उत्तरायणात शिशिर ऋतूमध्ये फाल्गुन वद्य तृतीयेला छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाल्याचे संस्कृत सुभाषितांम धून लिहून ठेवणाऱ्या कविंद्र परमानंदांनी शिवभारत अनुपुराण आणि परमानंद काव्य असे दोन संस्कृत ग्रंथ लिहिले. ९ मार्च १६७३ रोजी स्वामी कविंद्र परमानंदांना भेटण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पोलादपूर येथे आगमन झाले होते. शिवराज्याभिषेकप्रसंगी स्वामी परमानंद यांनी एक मुद्रा तयार केली होती. मात्र, शिवराज्याभिषेकाआधी काही दिवस स्वामी परमानंदांना देवाज्ञा झाली.

पोलादपूर शहरातील आनंदनगरलगतच्या स्वामी कविंद्र परमानंद मठाचे स्वरूप आता अधिक आकर्षक होऊ लागले असले तरी ऐतिहासिक स्वरूपाचे रूपडं गमावल्याचे दिसून येत आहे तर कविंद्र परमानंद यांचे जन्मगांव असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर तीर्थक्षेत्रापासून नेवासे या जन्म गावापासून केवळ १० कि.मी.अंतरावरील खेडले परमानंद या गावातील स्मारक देखील पडझडीने जर्जर झाले आहे. ऐतिहासिक वास्तुला सध्या अत्याधुनिक कार्यालयासारखे स्वरूप आणून झालेले सुशोभिकरण जरी दृष्टीकोनातून खटकत असले तरी सुशोभिकरण झाले असल्याचे समाधान वाटत आहे. दुसरीकडे, अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे जवळील खेडले परमानंद येथील स्वामी परमानंद यांची गढी अद्याप ऐतिहासिक वास्तुच्या खुणा घेऊन जर्जरतेतही परिचय देण्यासाठी ठाम उभी आहे. त्याठिकाणी अद्याप राज्यशासनाचे लक्षही गेले नसल्याने पोलादपूर आणि खेडले परमानंद येथील दोन्ही स्मारकांसाठी शिंदे फडणवीस सरकारने विशेष निधी व तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

# म्हसळा शहराच्या स्वच्छतेसाठी वासुदेवाची घरोघरी फेरी

**दै.रायगड नगरी । उदय कळस**

**म्हसळा** : वासुदेव आला हो वासुदेव आला चा आवाज म्हसळा शहरात कानावर पडत आहे. मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष असल कादिरी, उपनगराध्यक्ष संतोष शेडगे आणि सर्व नगरसेवक यांनी शहरात माझी वसुंधरा अभियान अंतर्गत वासुदेव फेरी काढून शहरातील नागरिकांना स्वच्छते विषयी सुखा कचरा आणि ओला कचरा वर्गीकरणासाठी शहरातून जनजागृती रॅली काढली.

कचरामुक्त शहर हे एकमेव उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण घरोघरी करणे अंत्यत महत्वाचे असल्याचा संदेश वासुदेव म्हसळा करांच्या दारी घेऊन आला. स्वच्छतेच्या या वासुदेवास धान्याचे दान मिळण्याची अपेक्षा नसताना घंटागाडी मध्ये वर्गीकृत कचऱ्याचे दान हवे आहे, असे प्रबोधन वासुदेव करीत होते. या रॅलीचे आयोजन अरुणोदय सुशिक्षित बेरोजगार संस्था मार्फत वासुदेव जनजागृती रॅली काढण्यात आली.

या रॅलीत मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, नगराध्यक्ष असल कादिरी,नगरसेविका राखी करंबे, नगरसेविका सरोज म्हशीलकर, नगरसेविका जयश्री कापरे, नगरसेवक अनिकेत पानसरे, नगर-सेवक संजय दिवेकर, नगरसेवक किरण गायकवाड करनिर्धारण व प्रशासकीय अधिकारी श्रीम. दिपाली मुंडये, लेखापरीक्षण हृदय आग्रे, श्रीम. आरती केंडे, श्रीम. ज्योती करडे, शहर समन्वयक श्रीम. प्रियंका चव्हाण,सुशिक्षित बेरोजगार संस्थेचे किशोर सीत-ाळे, मिलिंद पायकोळी, निहार धुमाळ, प्रतिक कांबळे, दीपती अंजर्लेकर प्रतिक जांभूळबंटी बोरकर, जय वारे, सचिन मोरे आणि नगरपंचातीचे सर्व कर्मचारी वर्ग उपस्थितीत होते.



# ओवीनाम मार्शल आर्ट स्पर्धेत रायगडच्या संघाची पदकांची भरभरून कमाई

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

राजगड तोरणा हॉटेल तालुका वाई सातारा येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय ओवीनाम मार्शल आर्ट स्पर्धेत रायगडच्या संघाने सर्वोत्तम कामगिरी करून सर्वच विभागातून भरभरून पदकांची कमाई केली आहे.


या स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातून मार्शल आर्टस् स्पोर्ट्स अकॅडमीचे मास्टर कल्पेश शिंदे यांचे लाभलेले प्रशिक्षण व मार्गदर्शनाखाली जपान डिप्लोमा ब्लॅक बेल्ट यांच्या २५ मुलांनी ७ सुवर्ण पदके,५ रौप्य पदके,१३ कास्य पदकांची कमाई करुन स्वत:सह जिल्ह्याचेही नाव रोशन केले आहे.या स्पर्धेत दिपेश खाडे मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी कोच,रिया पाटील - मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी इन्स्ट्रक्टर सुवर्ण पदक,आशा किरण इंग्लिश मिडीयम स्कूल पानेड पेण सुवर्ण पदक,वरुन खैरे सुवर्ण पदक,आर्यन पाटील सुवर्ण पदक पार्थ सावंत सुवर्ण पदक व रौप्य पदक,आधिराज खंडागळे रौप्य पदक, सार्थक सावंत रौप्य पदक,कश्यप कांबळे - रौप्यपदक स्वरुप पवार,जिंदाल माऊंट लिट्रा झी स्कूल सुकेली सुवर्ण पदक,कार्तिकी बेडेकर सुवर्ण व रौप्य पदक वंशसिंग परदेशी -रौप्य पदक व कास्य पदक तसेच प्रथमेश कोदे,सक्षम कोदे,वेदसिंग परदेशी,आराध्य जवके,शिवम बेडेकर,मुस्कान पूनिया व श्रेया चिंचावडे यांनी कांस्यपदकांची कमाई केली आहे.त्याचप्रमाणे बालविकास स्कूल वाढावं हर्ष ठाकूर,दिया म्हात्रे यांनी सुवर्ण पदक व सेजल म्हात्रे कास्य पदक,ग. बा.वडेर स्कूल पाली रौप्य पदक,सनया निगुडसे रौप्य पदक व कांस्य पदक,सनिया वझरकर,भूमी भोईर कास्य पदक, नगर पालिका खोपोली स्कूल रौप्य पदक,करण जाधव रौप्य पदक,मुक्ताई स्कूल पानेड पेण व ऋषीकेश खंडागळे यांनी कास्य पदक पटकावले आहे.

रायगडच्या या खेळाडूंनी राज्यस्तरीय ओवीनाम मार्शल आर्ट स्पर्धेत मिळविलेल्या सुयशाबद्दल संपूर्ण रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्याकडून अभिनंदन व्यक होताना दिसत आहे.

# श्री जोगेश्वरी मातेच्या मूळ स्थानावर 30 डिसेंबरला महापूजेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे गावाची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेचे मूळ स्थान असलेले नागोठण्याचे पूर्वेकडील डोंगर (घरळी) येथे शांती होम व श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन शुक्रवार दि. ३० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता करण्यात आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पूजा विधी संपन्न झाल्यानंतर दुपारपासून मातेचा दर्शन सोहळा सुरु होणार असून तो रात्रीपर्यंत सुरू राहणार आहे.



या महापूजेच्या निमित्ताने सायंकाळी ४ ते ७ वा. दरम्यान महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले आहे. त्यानंतर ६ ते ८ वा. दरम्यान संतसेवा मंडळ नागोठणे यांचा हरिपाठ होणार आहे. तरी ता भक्तिमय कार्यक्रमास समस्त भाविक, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संखेने उपस्थित राहून या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे अवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा यशस्वी होण्यासाठी खडकआळी ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ तसेच ज्वाला ग्रुप खडकआळी मेहनत घेत आहेत.

# खारघर मध्ये 'विदर्भ युवक सामाजिक सांस्कृतिक विकास मंडळ' ची स्थापना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका हद्दीत आणि नवी मुंबई वास्तव्य करणाऱ्या विदर्भातील सामाजिक कार्यकर्त्यांनी खारघर मध्ये बैठक घेवून विदर्भातील रुढी, परंपरा आणि सण उत्स-वाची परंपरा टिकवून ठेवण्यासाठी 'विदर्भ युवक सामाजिक सांस्कृतिक विकास मंडळ' ची स्थापना केल्याने विदर्भ मधील नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

विदर्भातील अनेक जण पनवेल आणि नवी मुंबई परिसरात वास्तव्य करुन नोकरी, उद्योग, व्यवसाय करीत आहेत. विदर्भ मधील नागरिकांमध्ये एकजूट निर्माण व्हावी तसेच विदर्भातील रुढी, परंपरा आणि सण, उत्स-वाची परंपरा टिकून राहावी, यासाठी 'विदर्भ युवक सामाजिक सांस्कृतिक विकास मंडळ'ची स्थापना करण्यात आली असून, या मंडळाचे कामकाज पाहण्यासाठी विजयकुमार कोहाड, कृष्णा खडगी,जनार्दन धुते, गणेश चुणचुणवार, अश्विनी हडपे, अनुराधा रंगारी, वैशाली चुणच-ुणवार, आशिष रंगारी, अनिल नहाते, अनिल मोटघरे, दिलीप नंदनवार, विरेंद्र किंगारे, सुधाकर सोरटे, कुंडलिक पौनीकर आदी पदाधिकाऱ्यांची निवड झाली आहे. 'विदर्भ युवक सामाजिक-सांस्कृतिक विकास कामे केली जाणार आहेत.मंडळ'च्या अधिपत्याखाली विदर्भातील खाद्य संस्कृती आणि सामाजिक संस्कृतीचा प्रसार, प्रचार करणे, विदर्भातील थोर संत महापुरुषांच्या जयंती साजरी करुन व्याख्यानमाला आयोजित करणे, युवक-युवतींना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, व्यवसाय वाढीसाठी सर्वतोपरी सहकार्य करणे, प्रतिष्ठित व्यावसायिक, डॉक्टर, कलाकार, खे-ळाडू, उच्चविद्या भूषित विद्यार्थी आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय करणाऱ्यांना सन्मानित करणे, गोर-गरीब तसेच गरजू आणि होतकरुंना आर्थिक मदत करणे आदी कामे केली जाणार आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## इको गाडीची मोटार सायकलीस धडक : एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल ते उसर्ली अशी मोटारसायकल घेऊन जाणाऱ्या चालकास इको गाडीची धडक बसून त्यात तो जखमी झाला आहे. सुनील चव्हाण ( वय २८ ) हा त्याच्या ताब्यातील मोटारसायकल घेऊन पनवेल ते उसर्ली असा जात असताना त्याच्या गाडीला पाठीमागून इको गाडीने ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात तो जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## राहत्या घरातून देशी विदेशी मद्य साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराजवळील मोहो गावाच्या हद्दीत एका इसमाने राहत्या घरात देशी विदेशी मध्य साठा केला होता. तो साठा पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने हस्तगत केला आहे. मोहो गावाच्या हद्दीत एका घरात एका इसमाने देशी विदेशी मध्य साठा केला असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाताच विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून विविध प्रकारच्या २२१० /- रुपये किमतीचा साठा हस्तगत केला आहे.

## बोर्ली ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या नजमा दळवी यांचे दु:खद निधन


**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या नजमा यासीन दळवी यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी मंगळवार दि.२७ डिसेंबर २०२२ रोजी पहाटे २.०० वा.राहत्या घरी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नौशाद दळवी यांच्या त्या काकी होत. नजमा दळवी ह्या मागील काळात शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून ग्रामपंचायत सदस्या निवडून आल्या होत्या.त्यांच्या निधनाबद्दल शेतकरी कामगार पक्षाच्या माजी राज्यमंत्री मिनाक्षी पाटील, शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी शोक व्यक्त केला आहे. आपल्या कारकिर्दीत त्यांनी गावाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे.त्यांच्या दफन विधीला विविध क्षेत्रातील मान्यवर, आप्तेष्ट नातेवाईक मित्र परिवार उपस्थित होते.

# ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सज्ज : अतुल झेंडे

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** : ३१ डिसेंबर च्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सज्ज आहे, नियमांचे पालन करून नविन वर्षाचे स्वागत करा असे आवाहन जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी कर्जत मध्ये केले.



कर्जत पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी सुरू आहे, या पार्श्वभूमीवर अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक के.डी. कोल्हे उपस्थित होते. कर्जत पोलीस ठाण्यात १८३ गुन्हे दाखल आहेत त्यामध्ये ३०–३५ टक्के गुन्हे हे मालमत्ता चोरीचे आहेत, १०–१५ टक्के गुन्हे हे फसवणूकीचे आहेत, इतर गुन्हे आहेत. इतर तालुक्याच्या प्रमाणात कर्जत पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्ह्याचे प्रमाण जास्त आहे, कर्जत पोलीस ठाण्यात सुमारे ५० कर्मचारी वर्ग असल्याचे सांगितले. इतर जिल्ह्या– तील तरुण पोलीस दलात भरती होतात, मात्र त्या नंतर ते जिल्हा बदली च्या मागे लागतात त्यामुळे काही समस्यां उद्‌भवतात, जास्तीत जास्त स्थानिक तरुणांनी पोलीस दलात भरती व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत अडीच हजार फार्म हाऊस आहेत, कोरोना महामारीच्या दोन वर्षानंतर नविन वर्षाचे स्वागत जोरात होण्याच्या शक्यता लक्षात घेवून ३१ डिसेंबर च्या पार्श्वभूमीवर ३० आणि ३१ डिसेंबर रोजी नाकाबंदी मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे, परवानगी शिवाय कोणताही कार्यक्रम करू नका,पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फार्म हाऊस वर पोलिसांची नजर असणार आहे, मद्यपान करून गाडी चालविण्यावर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन गाड्या पेट्रोलिंग साठी राहणार आहेत, शासनाने नियम ठरवून दिले आहे त्याचे पालन करून नविन वर्षाचे स्वागत करा.

# पनवेल महानगरपालिका पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थेत बहुजन विकास पॅनल विजयी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पन–वेल महानगरपालिका पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थेची निवडणूक नुकतीच पार पडली या निवडणूकीत राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या मार्गदर्शनाखाली बहुजन विकास पॅनल चे पंधरा पैकी चौदा उमेदवार विजयी झाले असून पतसंस्थेवर बहुजन विकास पॅनलचे राज्य आले आहे .



पनवेल महानगरपालिका पग–ारदार नोकरांची सहकारी पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली सन २०२२ ते २०२७ या कालावधी करिता हि निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली या निवडणुकीमध्ये राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या मार्गदर्शनाखाली बहुजन विकास पॅनल ने आपले धडाडीचे १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते त्या पैकी सर्वसाधारण मतदार संघातील १० पैकी १०.महिला राखीव मतदार संघातून २ पैकी २. तसेच इतर मागासवर्ग मतदार संघातून १ पैकी १. तसेच भटक्या विमुक्त जाती जमाती या मतदार संघातून १ उमेदवार बिनविरोध निवडून दिल्याने एकूण १४ उमेदवार भरघोस मतांनी निवडून आल्याने पतसंस्थेच्या चाव्या बहुजन विकास पॅनल कडे आल्या आहेत. या कामी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे पनवेल विभागाचे अध्यक्ष शरद कांबळे, महासचिव सतिश चौंडालिया, खजिनदार भावेश चंदने, पतसंस्थाचे माजी अध्यक्ष कैलास सोलंकी, तसेच संतोष सोनवणे, संतोष गायकवाड, रुपेश चीखुक, पतसंस्थाचे माजी अध्यक्ष मनोहर गोंधळी, सागर खरारे, कुणाल साळवे, दिपक चव्हाण, निलेश सदावर्ते, अजय टाक, गुरुनाथ भगत, दिव्या टाक, राजेश डोंगरे, मनोज चव्हाण, मनोज गायकवाड, संजय किसन जाधव, संजय शिराम कांबळे, अरुण चिंतामण कांबळे, विकी परमार, दिपक बागडी, धर्मेंद्र पारचे, अमित पार्चे, रवि गायकवाड, मनोज कांबळे, रुचिरा साळवे, सुरेखा गायकवाड, सायली कांबळे, सुवर्णा गायकवाड, सुवर्णा चव्हाण, नरेश बहोत, सुरेश लिडलॉन, सुभाष धिंग्या, रवि बैद, संजय मोहिते, विष्णू जाधव, संतोष चितळे, योगेश मंजुळे, दिनेश बाबरे, निलेश बाबरे, धनराज पवार यांनी विशेष परिश्रम घेऊन १५ पैकी १४ जागांवर विजय संपादन करून पतसंस्थेवर बहुजन विकास पॅनल ने एकहाती सत्ता घेतली आहे.

# नेत्रतपासणीकरीता आलेला वृध्द दरीत कोसळला ; उपचारा दरम्यान मृत्यू

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कापडे खुर्द येथील एक वृध्द नेत्रतपासणी शिबिरासाठी पोल–ादपूर शहरामध्ये आला असताना घरी वेळेवर न पोहोचल्याने शोधाशोध केली असता दरीमध्ये जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये प्राथमिक उपचारानंतर मुंबई येथील जे.जे. हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असताना मयत झाल्याची माहिती पोलादपूर पोलीसांना कळविण्यात आल्यानुसार याप्रकरणी अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर २३–२०२२ नुसार नोंद केल्याची माहिती तपासिक अंमलदार संदीप शिरगांवकर यांनी दिली आहे. दि.१९ डिसेंबर २०२२ रोजी पोलादपूर शहरात नेत्रतपासणी शिबिरासाठी आलेला रामचंद्र महादेव बावळेकर (वय ६५, मु.पो.कापडे खुर्द,ता. पोलादपूर) हा डोळे तपासणीनंतर घरी परत गेला तरीही घरामध्ये रात्री ९ वाजेपर्यंत न आल्याने त्याची आई आणि चुलते गंगाराम बावळेकर यांनी त्यांचा शोध घेतला असताना पोलादपूरच्या दिशेने वाटेवर त्यांची एक चप्पल आणि टॉवेल आढळून आला म्हणून त्यांचा शोध घेतल्यानंतर दरीमध्ये टेकडीच्या पायथ्याशी जखमी आणि बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांच्या डोक्याला आणि पोटाला मार लागलेला असल्याने त्यांना तातडीने पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये हलविण्यात आले. तेथून त्यांना जे.जे. हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यास जाण्यास सांगितल्याने २० डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ७ वाजता आंतररुग्ण कक्षामध्ये वॉर्ड क्रमांक ०४ मध्ये दाखल करून घेण्यात आले. मात्र, याठिकाणी उपचारादरम्यान सायंकाळी ५ वाजून १० मिनीटांनी रामचंद्र महादेव बावळेकर यांचे निधन झाल्याचे समजून आले. यानंतर पोस्टमॉर्टेम करून जे.जे. मार्ग रुग्णालय, परीमंडळ पोलीस निरिक्षक स्वप्नाली भोसले यांनी इन्क्वेस्ट पंचनामा करून २४ डिसेंबर २०२२ रोजी संबंधित कागदपत्रे पोलादपूर पोलीस ठाण्याकडे ०० नंबरने पाठविली. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार पोलीस हवालदार संदीप शिरगांवकर अधिक तपास करीत आहेत.

# मोफत महाआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कर्जत**

शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आणि सनराईझ मेडिकल फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात ४८५ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी मोफत चष्मे वाटपही करण्यात आले.

कर्जत मुद्रे विभागातील श्री मुद्रेश्वर मंदिराच्या सभागृहात माजी नगरसेवक संतोष पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आणि सनराईझ मेडिकल फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. उप जिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, माजी उपसभापती पंढरीनाथ राऊत, राजाराम शेळके, समीर साळोखे, राजेश जाधव, नगरसेविका संचिता पाटील, माजी नगरसेवक भालचंद्र जोशी, कृष्णा घाडगे, ज्ञानेश्वर भालीवडे, माधव कोळंबे, वसंत मोधळे आदी उपस्थित होते.

संदीप पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मुकुंद मोधळे यांनी प्रास्ताविकात शिबिराचा उद्देश सांगितला. भालचंद्र जोशी, उत्तम कोळंबे, नितीन सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर आरोग्य तपासणीचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी सनराईझ मेडिकल फाऊंडेशन पुण्याच्या संस्कार सेवा संस्थेच्या रुग्णमित्र पिंकी पाटील, डॉ. रोहित, डॉ. सुप्रिया, डॉ. सुमित, हरखेश पाडे, दिनेश कोकल, वंदना चोधरी यांनी रुग्णांची तपासणी केली. ४८५ जणांची तप–ासणी करून ज्या रुग्णांना शस्त्रक्रिया करण्याची



आवश्यकता आहे. तसेच नेत्र तपासणी नंतर ज्या रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया करायच्या आहेत. त्या मोफत करण्यात येतील. असे येथे जाहीर करण्यात आले. याप्रसंगी मोफत चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिरास उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगरसेवक उमेश गायकवाड यांनी भेट दिली. याप्रसंगी सदाशिव बैलमारे, भीम मुसळे, प्रमोद खराडे, गोवर्धन जोहरे, यशवंत पवार आदी उपस्थित होते.

# रोहे तालुका मुख्याध्यापक संघाच्या वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

राज्य मुख्याध्यापक संघ व रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघ संलग्न रोहे तालुका मुख्याध्यापक संघाच्या वक्तृत्व स्पर्धा कोएसो मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय रोहा येथे मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आल्या. तालुका मुख्याध्यापक संघाचे रमेश अध्यक्ष मोसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या स्पर्धेप्रसंगी रा.जि.उपाध्यक्ष नितिन गोरिवले, के.आर.पाटील, गणित विभाग प्रमुख संग्राम गायकवाड, स्पर्धा प्रमुख परशुराम परिहार, नारायण पानसरे, सौ.वसावे, जोशी, श्री.कोकरे, चौधरी, नागरे, कोकळे, लोहकरे, कचरे, गिरी, अहिरे, अक्षता म्हात्रे, मनिषा पाटील आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. ही स्पर्धा इ.५ ते ७,इ.८ ते १० व ११ वी,१२ या गटात घेण्यात आली. या स्पर्धेत विजयी झालेल्या पहिल्या दोन स्पर्धकांची निवड जिल्हा स्तरावर ६ जाने.रोजी पनवेल येथे होणा–या जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मेहेंदळे हायस्कूल येथील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले.

# वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा वैश्य समाज संघ,यांच्यातर्फे रायगड जिल्ह्यातील वैश्य वाणी समाजातील सर्व विद्यार्थी व बांधवांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

ही स्पर्धा ऑनलाइन होणार असून मोबाईल लिंक दिली जाईल, सूचना अगोदर दिल्या जातील, त्या सर्वांना बंधनकारक असतील. सर्व गटासाठी भाषणाची वेळ प्रत्येकी तीन मिनिटे असेल. प्रत्येक गटातून दोन क्रमांक काढले जातील. त्यांना महिला मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात बक्षीस वितरण केले जाईल.

१ ली ते ४ थीसाठी विषय – मी जेव–ताना टीव्ही/ मोबाईल बघावा का ? हा आहे. ५ वी ते ८ वीसाठी मी कोणत्या माध्यमातून (मातृभाषा की इंग्रजी) शिक्षण घ्यावे हा विषय आहे. ९ वी ते १२ वी साठी विद्यार्थी म्हणून आई वडिलांच्या माझ्याकडून काय अपेक्षा असाव्यात हा विषय देण्यात आलेला आहे.

तर वय वर्षे २० व त्या पुढील ( वयाचे बंधन नाही) खुला गटसाठी मी आणि माझा वैश्यवाणी समाज (माझी कर्तव्ये आणि अपेक्षा) हा विषय देण्यात आला आहे. वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संतोष चौधरी ७३०३६१६५१८ या क्रमांकावर ५ जानेवारी पर्यंत नावे पाठवावीत. स्पर्धा रविवार ८ जानेवारी रोजी सकाळी १० ते संपेपर्यंत घेतली जाईल. तर महिला मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात याचे बक्षीस वितरण होईल.

## तळोजा मध्यवर्ती कारागृहात कैद्याची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा मध्यवर्ती कारागृहात एका कैद्याने मध्यरात्रीच्या सुमारास आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

करण प्रमोद सीरियन असे या कैद्याचे नाव असून त्याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने तो गेल्या तीन महिन्यापासून तळोजा मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता.

दरम्यान मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्याने कारागृहात आत्महत्या केल्याची माहिती मिळत आहे.


अॅड.विजया रा. म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
फौ.चौ.अ.क्र.१४११/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२/२/२०२३

श्री.प्रफुल गुरुनाथ घरत ... अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ ... सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.प्रफुल गुरुनाथ घरत यांचा जन्म दि.१७/०४/१९९१ रोजी मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मामाच्या घरी झालेला आहे. सदर अर्जदार श्री.प्रफुल गुरुनाथ घरत याने जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार श्री.प्रफुल गुरुनाथ घरत यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झालेला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांजकडून लागलीच पुरावा घेवून त्यास जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी आज दि.२६/१२/२०२२ रोजी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**

शुक्रतारा बिल्डींग, तळमजला, कामतआळी, सतकार प्रेस समोर, ता.अलिबाग, जि.रायगड
दूरध्वनी क्र./फॅक्स क्र.०२१४१–२२२०१३ ईमेल ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

स्नेहसागर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड यांनी गैरअर्जदार १) मेसर्स सुर्यप्रभा इंटरप्रायझेस व इतर भागीदार तर्फे श्री.ओमप्रकाश मांगेराम आगरवाल (जागा मालक) रा.यदुकूल, पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१, २) युगान्तक को.ऑप.हौ.सोसायटीचे डायरेक्टर एल.आर.वेंकटरमण पत्ता भूमी लॅन्डमार्क, ऑफिस नं.५०१, प्लॉट ३४/३४ अ, सेक्टर १७, खांदा कॉलनी सिग्नल जवळ, नवीन पनवेल ४१०२०६, ३) श्री.ओमप्रकाश मांगेराम आगरवाल रा.यदुकूल, पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर मुंबई ४०००७१ यांचेविरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**पालीदेवद, सुकापूर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड गट नं.४७/अ, प्लॉट नं.४, क्षेत्रफळ ९८७.०० चौमी.**

सर्व गैरअर्जदार अनुपस्थित असल्याने तसेच त्यांचे कोणतेही म्हणणे प्राप्त झाले नसल्याने अर्जदारांनी जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. सबब या जाहीर नोटीस अन्वये सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, त्यांचे म्हणणे दाखल करणेसाठी त्यांनी दि.३०/०१/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता विहित रितीने निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे. तसेच वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे वर नमूद दिवशी उपस्थित राहून मांडावे. यात कसूर झाल्यास त्यांचे काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून त्यांचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करून उचित आदेश पारित करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २८/१२/२०२२

सही/–
(डॉ.सोपान शिंदे)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड–अलिबाग



**ग्रामपंचायत कोळखे**

ता.पनवेल, जि.रायगड

**जाहीर निविदा**

दि. २८/१२/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील वस्तू ग्रामसंघा करिता खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. २९/१२/२०२२ ते ०५/०१/२०२३ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ०५/०१/२०२३ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येईल. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | नग |
|---|---|---|
| १ | पापड बनविण्याचे मशिन खरेदी करणे | २ |
| २ | पीठ बनविण्याचे मशिन खरेदी करणे | २ |
| ३ | भाकरी मशिन खरेदी करणे | २ |

**अटी व शर्ती :–**

१) सर्वात कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रुपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

सही/– ग्रामसेवक ग्रामपंचायत कोळखे | सही/– सरपंच ग्रामपंचायत कोळखे

# संक्षिप्त...

## ऑमरॉन कंपनीच्या तीन बॅटऱ्यांची चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

ऑमरॉन कंपनीच्या तीन बॅटऱ्यांची चोरी झाल्याची घटना शहरातील बावन बंगला रोड वरील हेंद्रे बिल्डिंगच्या बाजूला उभ्या करून ठेवलेल्या टाटा गोल्ड गाडीत घडली आहे.

अभिजित नायकवडी ( वय ३० ) यांनी तीन गाड्या त्याठिकाणी उभ्या ठेवल्या असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाड्यांमधून ९०००/- रु किमतीच्या ऑमरॉन कंपनीच्या तीन बॅटऱ्या चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अमरकोष-पठन-स्पर्धा-२०२२ चे आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

महर्षि व्यास विद्या प्रतिष्ठान आयोजित अमरकोष–पठन–स्पर्धा–२०२२ (बालवर्ग ते दहावी) चे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. महर्षि व्यास विद्या प्रतिष्ठान, मुंबई द्वारा अमरकोश पठन स्पर्धेचे आयोजन गेली अनेक वर्षे केले जाते. मुंबई आणि मुंबई बाहेरही अनेक केंद्रांवर ही स्पर्धा घेण्यात येते. पनवेल केंद्राची अमरकोश पठन स्पर्धा रविवार दिनांक २२ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत आयोजित करण्यात आली आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी , संस्कृतप्रेमी जनांनी यात सहभागी व्हावे आणि अमरकोश आणि पर्यायाने संस्कृत भाषेच्या प्रचाराचे कार्य पुढे न्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तरी लवकरात लवकर आपले नाव नोंदवावे. अधिक माहितीसाठी स्नेहा साठे – ९९८७०८६२४८, चित्रा मानकामे – ९९६९४३३८६९ या क्रमांकावर संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# पनवेल महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेलच्यावतीने 'पनवेल फेस्टीव्हलचे' आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेलच्यावतीने 'पनवेल फेस्टीव्हलचे आयोजन २३ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान खांदेश्वर रेल्वे स्थानकाजवळील सिडको मैदानात करण्यात आले आहे. यावर्षी पनवेल महानगरपालिका स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेल रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. या दोन्हीच्या पार्श्वभूमीवर दहा दिवस भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या महोत्सवामध्ये करण्यात आले आहे.

आयुक्त तथा प्रशासक श्री.गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गेली वर्षभर स्वातंत्र्याच्याअमृत महोत्सवांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन महापालिकेच्यावतीने करण्यात आले येतआहे.'पनवेल फेस्टीव्हल हाही या कार्यक्रमामधील एक उपक्रम असून या



कार्यक्रमास आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

नुकतेच या महोत्सवामध्ये भारतातील विविध राज्याची नृत्य संस्कृती दाखविणारा ' नृत्य रंग' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, रोटरी क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष राजेंद्र मोरे, आंतरराष्ट्रीय किर्तीची सुत्रसंचालक, अभिनेत्री सिमरन आहूजा उपस्थितीत होते. तसेच या कार्यक्रमास पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

याबरोबरच नुकतेच या महोत्सवामध्ये लावणी, हास्य् कवी संमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच उर्वरीत दिवसांमध्ये महाराष्ट्राची परंपरा दर्शविणारा महाराष्ट्राची लोकधारा, भारतीय संस्कृती आणि शिल्पकलेची माहिती सांगणारा नृत्याचा कार्यक्रम तसेच छ. शिवाजी महाराजांची जीवनगाथा नृत्य अविष्कारातून सादर करण्यात येणार आहे. याशिवाय 'मोक्ष रॉक बँड'कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर असे विविध कार्यक्रम या दहा दिवसाच्या महोत्सवामध्ये सादर करण्यात येणार आहे. या महोत्सवामध्ये भव्य रंगमंचासहित प्रीमियम स्टॉल, स्थानिक वस्तुची विक्री करणारे स्टॉल्स, प्रदर्शने असे जवळपास विविध २०० हुन अधिक स्टॉल, ५० हुन अधिक फूड स्टॉल, भव्य आकाश पाळणे तसेच इतर खेळ आणि मनोरंजनाची साधने या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.त्याचबरोबर विविध स्पर्धा आणि कार्यशाळा सुद्धा या महोत्सवामध्ये घेतल्या जात आहेत.

# नेरे जवळ खड्ड्यांमुळे सकाळी व संध्याकाळी वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी

दै.रायगड नगरी । पनवेल

नेरे येथील पोलिस चौकी ते बँक ऑफ इंडिया शाखा नेरे येथील रस्त्यातील खड्डे व रस्त्याच्या दोन्ही बाजूला केलेला मातीचा भराव (साईड पट्टी) खचलेली आहे. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. त्यामुळे येथील काम त्वरित करण्याची मागणी मनसेतर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाला करण्यात आली आहे.

एक ते दिड महिन्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नेरे येथील बसस्थानक मुख्य बाजारपेठ चौक असलेला पोलिस चौकी ते बँक ऑफ इंडिया, शाखा नेरे येथे अंदाजे १०० मीटर रस्त्याचे सिमेंट कांक्रीटीकरण करून काम पूर्ण करण्यात आले. सदरचा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. परंतु ६ ते ८ इंच कांक्रीटीकरणामुळे मुख्य डांबरीकरण असलेला रस्ता व कांक्रीटीकरण केलेला रस्ता याच्यामध्ये ३ ते ४ इंच उंचीचा फरक पडला. कांक्रीटीकरण केलेला रस्ता व मुख्य डांबरीकरण असलेला रस्ता यांच्यामधील टप्प्याचे काम न करताच सदरचा रस्ता रहदारीसाठी सुरू करण्यात आला. रहदारीमुळे हा टप्पा खड्डेमय झालेला आहे. प्रवाशांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. खड्यांमुळे सकाळी व संध्याकाळी तेथे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होते. तसेच अंदाजे १०० मीटर सिमेंट कांक्रीटीकरण केलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला केलेला मातीचा भराव (साईड पट्टी) खचलेली आहे. तरी संबंधित ठेकेदारास सूचना करून सदरचे काम लवकरात लवकर करून घेण्याचे निवेदन मनसेचे दिनेश मांडवकर–पनवेल तालुका सचिव, विश्वास पाटील –पनवेल तालुका उपाध्यक्ष, विद्याधर चोरघे–नेरे विभाग अध्यक्ष यानी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहे.



शिरढोण ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सरपंच वैशाली ऋषिकेश भोईर यांचे अभिनंदन करताना शिरढोण येथील साई महिला बचत गटाच्या महिला

### बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या वतीने

# नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियंत्रण चोख करण्याची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

नाताळ व नुतन वर्ष साजरा करण्यासाठी बरेच नागरिक मुंबई व उपनगरातून वाहनांमार्फत मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असतात. त्यामुळे पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील खारघर, रोड पाली टोलनाका, कामोठे व कलंबोली सर्कलवर दररोज सकाळी व संध्याकाळच्या वेळेत वाहनांच्या वाहतूक कोंडीला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत अनेक वेळा असे निदर्शनास आले आहे की, रुग्णवाहिकांना सुद्धा ताटकळत उभे राहावे लागत आहे. या संदर्भात बाळासाहेबांचे शिव–सेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी बेलापूर येथे कोकण भवनामध्ये भेट घेतली.

यावेळी झालेल्या बैठकीमध्ये बाळासाहेबांची शिवसेनेच्या शिष्टमंडळाने एका निवेदनामार्फत मागणी केली की खारघर सर्कल, रोड पाली टोल नाका व कलंबोली सर्कल या तिन्ही ठिकाणी वाहतूक पोलिसांची गस्त वाढवावी तसेच वाहतुकीच्या ओघाप्रमाणे सिग्नल वेळेत बदल करावे जेणेकरून ज्या बाजूला वाहतुकींची संख्या जास्त असेल त्या बाजूला सिग्नल वेळ वाढवल्यामुळे कोंडीचे प्रमाण घटेल. तसेच,याबाबत बाळासाहेबांची शिवसेना नवी मुंबई वाहतूक पोलिसांसोबत पूर्णपणे सहकार्य करण्याचे आश्वासित केले असून, २८, २९, ३०, ३१ व १ तारखांदरम्यान पक्षाचे स्वयंसेवक नवी मुंबई वाहतूक पोलीस फोर्स सोबत वा–हतूक नियंत्रण करण्याकरिता खारघर सर्कल, रोड पाली टोल नाका व कलंबोली सर्कल या जागी तैनात करण्याचा प्रस्तावही उपयुक्तांना सादर केला. यावेळी बाळासाहेबांची शिवसेनेचे पनवेल विधानसभा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे , महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, महानगर संघटक मंगेश सुधाकर रानवडे, शहर प्रमुख प्रसाद परब, शहर संघटक इम्तियाज शेख उपस्थित होते.



# खारमाचेला बंधारा पुन्हा बांधण्यास जेएसडब्ल्यू कंपनीला खारभूमी विभागाचे आदेश

## २७०० एकर भातशेतीचे होणार सरक्षंण

दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल

पेण : पेण तालुक्यातील गडब –माचेला येथील नादुरुस्त झालेल्या उघडीत पाईप टाकुन उघाडी बांधली होती, यामुळे समुद्राचे पाणी शेतीत येत नव्हते परिणामी परिसरातील संपूर्ण शेतीचे संरक्षण होत होते. परंतु येथील स्थानिक बापदेव मंडळाच्या शेतक–यांनी व मच्छीमारांनी हे पाईप काढण्याची व बंधारा काढण्याची मागणी खारलॅन्ड विभागाकडे केली होती त्या मागणीनुसार खारलॅन्ड खात्याने हा बंधारा तोडल्याने समुद्राचे पाणी या परिसरातील शेतीत शिरण्याची शक्यता होती. त्यामुळे पेण तालुक्यातील खारमाचेला, खारचिर्बी, खारघ–टट, खारजांभेळा व जुईअब्बास विभागातील साधारणता २७०० एकर शेतीत खारे पाणी शिरून सुपीक शेती नापीक होण्याच्या मार्गावर आहे. त्या मुळे या विभागातील शेकडो शेतकरी धास्तावले आहेत.

खारलँड विभागाने शेतीचा बचाव करणारी खारबंदिस्ती तोडल्याने वेगवान प्रवाहाने खारे पाणी शेतात शिरण्याची शक्यता निर्माण



झाली आहे. त्यामुळे लागवडीखालील मोठ्या पीक क्षेत्राला फटका बसणार आहे. शेतीवर अवलंबून शेकडो शेतकरी उध्वस्त होणार आहेत. त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येणार असल्याने येथील शेतक–यांनी बुधवारी (ता.२८) खारलॅण्ड विभागाने तोडलेला बंधारा बांधण्याच्या मागणीसाठी आंदोलनाचा व सामुहीक आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने खारभुमी विभागाचे कार्यकारी अभियंता सुहास सांवत व येथील शेतक–यां सोबत बैठक होवुन येथील बंधारा जेएसडब्लु कंपनीने बांधावा असे लेखी पत्र देत आदेशच खारभुमी विभागाने जेएसडब्लु कंपनीला दिले आहेत. यावेळी आंदोलनावेळी शेतकरी तुळशीदास कोठेकर, अंकुश म्हात्रे, निलेश कोठेकर, दीपक कोठेकर, समीर म्हात्रे, प्रभाकर कोठेकर, प्रशांत म्हात्रे, अभिमन्यू कोठेकर, परशुराम मोकल, अनिल कोठेकर, अमोल म्हात्रे, विजय मढवी, कृष्णा म्हात्रे, हरेष कोठेकर, स्वप्नील सीताराम कोठेकर, अमित पाटील, हेमंत कोठेकर, किशोर मोकल, प्रभाकर कोठेकर, जगदीश कोठेकर, सुनील मोकल आदांसह असंख्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हसळा शहरातील डम्पिंग ग्राऊंडला विरोध



दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा शहरालगत असलेल्या दुर्गावाडी रस्त्यानजीक नगरपंचायतने डम्पिंग ग्राउंड काही वर्षांपूर्वी सुरू केले होते. याच परिसरात म्हसळा शहराचे ग्रामदैवत श्री धावीर देव महाराज यांच्या तीन बहिणींपैकी धरणकर्णी देवीचे स्थान आहे. सदर डम्पिंग ग्राउंडची व्याप्ती आता इतकी वाढली आहे की हे देवीचे स्थान अपवित्र होत चालले आहे. त्यामुळे हे डम्पिंग ग्राउंड अन्यठिकाणी हल–वावे अशी मागणी म्हसळा शहर हिंदू ग्रामस्थ मंडळ यांनी म्हसळा नगरपंचायतचे नगराध्यक्ष असहल कादरी आणि मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांना लेखी निवेदन देऊन केली आहे.

यावेळी हिंदू ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष नंदकुमार गोविलकर, सचिव सुशील यादव, खजिनदार योगेश करडे, भालचंद्र दातार, दिलीप पानसरे, समीर बनकर, गणेश हेंगिष्टे, सचिन करडे, उपनगराध्यक्ष सुनील शेडगे, नगरसेवक अनिकेत पानसरे, सुनील अंजर्लेकर, गौरव पोतदार, प्रदीप कदम, निमेश म्हशीलकर, विशाल साळुंखे, अजय करंबे निकेश कोकचा, दिपल शिर्के उपस्थीत होते. डम्पिंग ग्राऊंडला दुसरी जागा मंजूर झाली असून काम प्रगती पथावर आहे. त्यामुळे लवकरात लवकर डम्पिंग ग्राउंड हलवला जाईल असे आश्वासन म्हसळा नगरपंचायतचे गटनेते संजय कर्णिक यांनी उपस्थितांना दिले. डम्पिंग ग्राउंड हलवले नाही तर तीव्र आंदोलन करणार असा इशारा यावेळी ग्रामस्थांनी नगरपंचायत प्रशासनाला दिला.

# भेंडखळ शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शारदा म्हात्रे यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा संपन्न

दै.रायगड नगरी । अनंत नारंगीकर

उरण : प्राथमिक शाळा भेंडखळच्या मुख्याध्यापिका सौ शारदा संतोष म्हात्रे ( पदवीधर) या आपल्या ३४व्या प्रदिर्घ सेवेतून ३१ डिसेंबर २०२२ रोजी सेवा निवृत्त होत असल्याने केंद्र जसखारच्या वतीने प्राथमिक शाळा भेंडखळच्या सभागृहात सौ शारदा म्हात्रे यांच्या सेवापूर्ती कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सौ. प्रियांका पाटील, जसखार केंद्र प्रमुख पी.पी.म्हात्रे सर, गणेश ठाकूर सर,फुंडे शाळा मुख्याध्यापक उमेश म्हात्रे, पागोटे शाळा मुख्याध्यापक संजय केणी, वेश्वी शाळा मुख्याध्यापिका सौ. रंजना केणी, आदर्श शिक्षक कौशिक ठाकूर, उल्हास केणी आदि मान्यवरांनी निवृत्त मुख्याध्यापिका सौ शारदा संतोष म्हात्रे यांच्या शाळेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.यावेळी निवृत्त शिक्षक रा.का. म्हात्रे सर, यशवंत गावंड, संतोष म्हात्रे, पत्रकार जीवन केणी, केशव गावंड सर, किरण म्हात्रे सर, सौ जयश्री गावंड, सौ.चेताली म्हात्रे, शिक्षक महेश गावंड, विकास पाटील, अनिल पाटील सर आदी मान्यवर उपस्थित होते.




"KAMAL GAURI HIRU PATIL SHIKSHAN SANSTHA'S"

## B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY

(Affilliated to University of Mumbai MSBTE, DTE, Approved by AICTE PCIU/S 12 OF Pharmacy Act 1948)

Add : Plot No.29, Sector-11, Taloja, Navi Mumbai-410208

Email : bkpatilpharmacy2019@gmail.com

### WALK IN INTERVIEW

The following posts are to be filled in B K Patil Institute of Pharmacy, Taloja, Navi-Mumbai-410208

| Sr. No. | Subject | Designation |
|---|---|---|
| 1 | Pharmaceutical Chemistry (M.Pharm) | Assistant Professor |
| 2 | Pharmacology (M.Pharm) | Assistant Professor |
| 3 | Pharmaceutics (M.Pharm) | Assistant Professor |
| 4 | Quality Assurance (M.Pharm) | Assistant Professor |
| 5 | B.Pharmacy | Lecturer |
| 6 | M. lib / B. Lib | Lecturer |
| 7 | M.Sc./ B.Sc. | Lab Assistant |
| 8 | D. Pharm | Lab Assistant |
| 9 | B.Com / B.A. | Clerk |

Principal

B K Patil Institute of Pharmacy